Vol 4 Issue 3 Dec 2014

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

Review Of Research
Vol. 4 | Issue. 3 | Dec. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# मनोरमाबाई मेधावी : एक उपेक्षित नायिका

**प्रा. नंदकुमार ज्ञानोबा जाधव**

सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगांव, ता. दौंड, जि. पुणे.

### *1.प्रस्तावना :*

सबाल्टर्न या इतिहासलेखनाला छेद देऊन या क्षेत्रात नवी आव्हाने उभी केली. हा प्रवाह History From Below या विचारप्रवाहाषी मिळता जुळता आहे. किंबहुना सबाल्टर्न संदर्भात दृष्टि मांडताना History From Down Below असा शब्द प्रयोग केला जातो. या प्रवाहामध्ये वंचित शोषित दुर्लक्षित समूहाचा वा व्यक्तीचा अंतर्भाव होतो. इतिहासाच्या पडद्यामागच्या नायकांचे कर्तव्य अधोरेखित करण्यासाठी हा विचार प्रवाह प्राधान्य देतो.

या अनुषंगाने मनोरमाबाई मेधवी यांचे स्त्री सुधारणा कार्याविषयी माहिती प्रकाषात आणण्याच्या हेतूने प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन केले आहे.

### *2.उदि्दष्ट्ये :*

1.मनोरमाबाई मेधावी यांच्या स्त्रीसुधारणा कार्याचा परिचय करून देणे.
2.मनोरमाबाई मेधावी यांचे समाजपरिवर्तनातील योगदान तपासणे.
3.मनोरमाबाई मेधावी यांचे कार्य दुर्लक्षित राहण्याच्या कारणांचा शोध घेणे

### *3.पुर्वपरिचय :*

मनोरमाबाई मेधावी या थोर स्त्रीसुधारक पं. रमाबाई यांच्या कन्या होत्या. त्यांचा जन्म सिल्वर आसाम येथे सन 1881 मध्ये झाला. त्यांच्या जन्मानंतर केवळ आठच महिन्यांनी वडील बिपिनविहारीदास मेधावी यांचा मृत्यू झाला. पं. रमाबाईनी सप्टेंबर 1883 मध्ये धर्मांतर केले. त्याच बरोबर मनोरमाबाई ख्रिस्ती झाल्या. जन्मापासून सुरूवातीची सहा वर्षे त्या पदेशात राहिल्या. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण इंग्लंड व अमेरिकेला झाले. पं. रमाबाई आपल्या समाजकार्यात अडथळा येऊ नये म्हणून मनोरमाबाईना मातृत्वापासून दूर ठेवले. मनोरमाबाई वॉण्टेज मठवासिनींच्या सानिध्यात मोठ्या झाल्या. त्यामुळे त्यांच्या मनामध्ये ख्रिस्ताविषयी अपार श्रद्धा व प्रेम निर्माण झाले. परदेशातील शिक्षणअर्धवट सोडून त्या पं. रमाबाईच्या कार्याला मदत करण्यासाठी भारतात आल्या. पुढे संपूर्ण आयुष्य पुणे येथील शारदासदन व केडगांव येथील मुक्ती मिषन मधील अनाथ मुली व स्त्रियांची सेवा करण्यात समर्पित केले.

### *4. मनोरमाबाई यांचे कार्य :*

मनोरमाबाई या पं. रमाबाईच्या सहाय्यकर्त्या होत्या. अध्ययन व स्त्रीसुधारणा या श्रेष्ठ कार्याला त्यांनी आपले आयुष्य वाहिलेले दिसून येते. त्यांची सुरवातीची 18 वर्षे विद्यार्जनात गेली. व वयाच्या 19 व्या वर्षा पासून अखेर पर्यंत पं. रमाबाईच्या समाज कार्याला मदत केली. शारदासदनातील विधवा स्त्रियांच्या सवलीकरणासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली शारदासदन व मुक्तीमिशनच्या कार्यासाठी त्या पूर्ण वेळ कार्यरत होत्या. पं. रमाबाईचा पत्र व्यवहार त्याच पहात

असत. त्या केडगांवच्या मुक्तीमिशन मध्ये हि पं. रमाबाईंच्या कार्यामध्ये अग्रेसर राहिल्या.

मनोरमाबाईंचे सर्वात मोठे ऐतिहासीक कार्य म्हणजे त्यांनी मुक्तीमिशनमध्ये अंध स्त्रिया व मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. बार्तमी सदन या नावाने सुरू केलेली हि शाळा भारतातील पहिली अंध शाळा होती. मनोरमाबाईंनी इंग्लंडमधील वास्तव्यामध्ये शास्त्रशुद्ध ब्रेल लिपीचे प्रशिक्षण घेतले होते. त्यांनी ब्रेल लिपीतील टाईप तयार करून अभ्यासक्रमाची पुस्तके तयार केली. अंधशाळेसाठी प्रशिक्षित शिक्षिका तयार केल्या. या शाळेव्दारे अंध मुली व स्त्रीया यामध्ये स्वअस्तित्वाची जाणिव करून दिली. आजही या शाळेत शेकडो अंध मुली शिक्षण घेत आहेत.

मुक्तीमिशनमध्ये सुमारे अडीच हजार निराधार मुली व स्त्रीया वास्तव्यास होत्या. देशांच्या प्रांतातून दुष्काळी भागातून आलेल्या या मुली व स्त्रीया सुसंस्कारीत नव्हत्या. त्यांचे पालनपोषण करणे , त्यांना शिक्षण देणे , त्यांच्या साठी वैद्यकीय सुविधा पुरवणे इत्यादी कामाचा फार मोठा पसारा होता. पं. रमाबाई जरी मुक्तीमिशनच्या मुख्य संचालिका असल्यातरी त्यांना व्यवस्थापनामध्ये मदत करण्यासाठी मनोरमाबाईंनी आपले संपूर्ण अयुष्य समर्पित केले. सन 1904 नंतर पं. रमाबाईनी बायबलचे मराठी भाषांतर करण्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेतले, त्या अखेरच्या आयुष्यात संपूर्णपणे संन्यत्त जीवन जगल्या. अशावेळी मुक्तीमिशनची संपूर्ण जबाबदारी मनोरमाबाईंनीच पेलली होती. मुक्तीमिशनचे परदेशी संस्थाबरोबर संबंध वृद्धिंगत करण्यात मनोरमाबाईंनी मोठे योगदान दिले. मुक्तीमिशनला आर्थिक मदत कारणाऱ्या अमेरिकन असोशिएशन वार्षिक अहवाल तयार करूण पाठवले. हिशेबपत्रके सादर करणे. संस्थेची अंदाजपत्रके तयार करणे, शाळेचा शासकिय पत्र व्यवहार संभाळणे इत्यादी कांमामध्ये त्यांनी विशेष योगदान दिले.

मनोरमाबाईनी गुलबर्गा येथे शांती सदन नावाची शाळा सन 1913 मध्ये सुरू केली. हा प्रांत निजामाच्या हद्दित असून तेथील हिंदू व मुस्लीम लोकांचा मुलींच्या शिक्षणाला मोठा विरोध होता. हा विरोध डावलून त्यांनी पडदानशीन मुलींसाठी शाळा सुरू केली. व यशस्वीपणे चालवीली.

मनोमाबाईंनी खिस्ती प्रार्थना मंडळीची स्थापना करण्यासाठी ऑस्ट्रोलिया व न्युझीलंडचा दौरा केला. मुक्तीमिशनमध्ये धर्म संजिवन अवतरावे अशी पं. रमाबाईची इच्छा होती. ही इच्छा पुर्ण व्हावी या साठी मनोरमाबाईंनी देशात व परदेशात प्रार्थना संघ निर्माण केले. सन 1905 मध्ये मुक्तिमिशनमध्ये धर्मसंजिवन अवतरले यांचे सर्वश्री श्रेय मनोरमाबाईंना द्यावे लागेल.या धर्मसंजिवनानंतर पं रमाबाई पूर्णपणे धर्मभावनेच्या अधीन होत गेल्या. त्या पुढील काळात मुक्तिमिशनमध्ये हजारो मुलांची आध्यात्मिक उन्नती व्हावी म्हणून मनोरमाबाई दिवसरात्र झडल्या. हजारो मुलींना पवित्र आत्म्याचा स्पर्श व्हावा. या साठी प्रार्थना साखळी तयार केली. मुलींसाठी कडक उपवास केले. त्याचाच परिणाम म्हणजे मुक्तिमिशन खिस्ती समाजाचे अध्यात्मिक उन्नतीचे केंद्र बनले. अवघ्या खिस्ती जगासाठी ते तीर्थक्षेत्र बनले. मनोरमाबाईंनी मुक्मिमिशमधील शैक्षणिक, व्यवसायीक व अध्यात्मिक विभागांसाठी मोठे योगदान दिले. अनाथ मुली व स्त्रीयांच्या स्वावलंबनासाठी अनेक उद्योगांची उभारणी केली. मुली व स्त्रीयांना प्रशिक्षित करून आत्मसन्मान मिळवून दिला. 20 व्या शतकाच्या सुरूवातीला स्त्री सबलीकरणाचे प्राथमिक प्रयोग मनोरमाबाईच्या नेतृत्वाखाली मुक्तिमिशनमध्ये सुरू होते. त्यासाठी त्यांनी नविन सुधारणावादी दृष्टीकोन स्विकारला स्त्रियांच्या परंपरागत समाजजीवनात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात मनोरमाबाईंचे जिवन पं रमाबाईच्या ध्येयपूर्तीसाठी समर्पित केलेले होते. एका कृतीशील जावनक्रमाची ती उपेक्षित नायिका होती.

मनोरमाबाई यांचे स्त्रीसुधारणा कार्य उपेक्षित राहण्याचे मुख्य कारण म्हणजे त्या पं रमाबाईच्या कन्या होत्या. पं रमाबाई स्त्रीसुधारण्याच्या अग्रेसर होत्या तर मनोरमाबाई स्त्रीसुधारणा कार्याच्या सहकारी होत्या. मुक्तिमिशन कार्याची चर्चा पं रमाबाई यांच्या भोवतीच प्रमुख्याने होत राहिली. त्यामुळे पं रमाबाईच्या वलयांकित व उच्चदर्जाच्या व्यक्तिमत्वापुढे मनोरमाबाईचे कार्य झाकळले गेले. मनोरमाबाई हे कार्य खिस्ती समूहामध्ये व केडगांव सारख्या मर्यादीत भौगोलिक परीसरामध्ये राहून करीत होत्या मनोरमाबाईंचे खिस्तावरील आत्यंतिक प्रेम तत्कालीन समाजाला आवडले नाही. मुक्तीमिशन एक खिस्ती संस्था म्हणून समाजाच्या टिकेचे लक्ष बनली. या संस्थेमध्ये धर्मातरासाठी अनुकून स्थिती निर्माण केली जाते असा सतत आरोप होत राहिला. त्यामुळे या संस्थेला समाज मान्यता मिळाली नाही. परिणामी या संस्थेच्या कर्मयोगीनी नायिका पं रमाबाई व मनोरमाबाई यांच्या स्त्रीसुधारणा कार्याकडे समाजाने संशयाने पाहिले. किंबहुना तशी समाजाची मानसिकता तयार करण्याचे कार्य तत्कालीन काही वृत्तपत्रांनी केले. त्यामुळे मनोरमाबाईचे स्त्री सुधारणा कार्य उपेक्षित राहिले. मनोरमाबाईनी वयाच्या चाळीस वर्षापर्यंत अविवाहीत राहून अनाथ निराधार पद्दलित विविध रोगांनी जर्जर झालेल्या मुली व स्त्रीयांसाठी झटल्या. त्यासाठी त्यांनी स्वतःच्या प्रकृतीचीही पर्वा केली नाही. मात्र समाजाने वरील कारणामुळे त्यांच्या कार्याची दखल घेतली नाही. किंबहुना त्यांच्या कार्याविषयी नकारात्मक दृष्टीकोण्न बाळगला.

मनोरमाबाईंनी आधुनिक भारताच्या स्त्रीसुधारणा कार्यासाठी समर्पित जीवन जगल्या. समाजाने नकारलेल्या मुली व स्त्रीयाना आत्मसन्मानाचे बळ दिले. आजच्या स्त्री मुक्तीच्या संकल्पनेची बीचे त्यांच्या कार्यामध्ये दिसून येतात. निराधारासाठी आसरा शिक्षण व त्यांचे सबलीकरण या साठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांचे जीवन म्हणजे 'आईच्या कार्यासाठी समर्पित केलेली मुलगी' असे करावे लागेल. पं रमाबाईच्या स्वप्नपूर्तीसाठी इश्वराने दिलेला उत्तम प्रतिसाद म्हणजे मनोरमाबाई होत्या. मृत्युसमयी (24 जुलै 1921) मनोरमाबाईचे वय 40 वर्षाचे होते. त्यांच्या निधनाने स्त्री शिक्षणाच्या कार्यास वाहिलेली एक विदुषी नाहीशी झाली.

## *संदर्भ :*

1. टिळक दे.ना. महाराष्टाची तेजस्विनी पं.रमाबाई
2. ढेरे अरूणा, विस्मृतीचित्र
3. जोगळेकर मृणालीनी , स्त्री अस्मितेचा अविष्कार, पं.रमाबाई
4. शहा अे. बी. लेटर्स ॲड करस्पॉडन्स ऑफ पं.रमाबाई
5. साठे ताराबाई अपराजिता रमा
6. रमाबाई अमेरिकन असोशिएशनचे वार्षिक अहवाल
7. ठाकरे के.सी. पंडीता रमाबाअी सरस्वती.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ Directory Of Research Journal Indexing
- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com